पुणे
दिंनाक ८.२.२०१०

प्रति
गोसावी समाज संघटना
औरंगाबाद
C/o श्री डी आर गोस्वामी

विषय- गोसावी संप्रदायाबाबत माहीती आपले संस्थेचे वेबसाईटवर प्रसिध्द करणेबाबत.

महोदय

या सोबत गोसावी संप्रदायाबाबत माहीती सार्वत्रीक प्रसिध्दीसाठी पाठवीत आहे.

सदर माहीती गोसावी व त्यांचा संप्रदाय भाग (१) या पुस्तकावर आधारीत आहे. सदरचे पुस्तक सन १९२६ साली प्रसिध्द झाले. त्यानंतर सदरचे पुस्तक अत्यंत दुर्मीळ आहे.

सदर पुस्तकाचे लेखन करताना लेखक श्री पृथ्वीगीर हरिगिर गोस्वामी यानी अत्यंत उत्कृष्ट संदर्भग्रंथाचा उपयोग केला आहे.

या सोबत पाठवलेल्या माहीतीचा उपयोग जातीच्या अभ्यासकाना, संशोधकाना, जिज्ञासू यांना होईल अशी अपेक्षा आहे.

गोसावी संप्रदायाबाबत मोडी लिपीतील कागदपत्र प्राप्त करून त्यावर संशोधन करण्याचे काम आम्ही चालू केले आहे. असे कागद जर कोणाकडे उपलब्ध असतील तर ते जरूर पाठवावेत.

आपला स्नेहांकीत

POLICE INSPECTOR C. V. POLICE V. CELL
सत्यमेव जयते
PUNE-1

रमाकांत माने
पोलीस निरीक्षक (दक्षता पथक)
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती
पुणे विभाग पुणे जुनी पीएमटी बिल्डीग
१ला मजला शंकरशेठ रोड स्वारगेट, पुणे

संपर्क (फोन नं)- ९७६५९८८९४९

# गोसावी व त्यांचा संप्रदाय

संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ ।
तयोस्तु कर्मसंन्यासात् कर्मयोगो विशिष्यते ॥

गी. ५–२

दशनाम धारण करणारे गोसावी व त्यांचा संप्रदाय याविषयीं पुष्कळांचा गैरसमज आहे. कित्येक ' गोसावी हे अवैदिक शैव " आहेत असें समजतात तर कित्येक त्यांना " शैव संन्यासी " ह्मणचे " जे वैदिक संन्यासी नव्हत ते " अर्थात् ' अवैदिक संन्यासी ' समजतात. कित्येकांच्या मतें " ते नाथ सांप्रदायी " आहेत. सारांश, त्यांच्याविषयीं व त्यांच्या संप्रदायाविषयीं पुष्कळांस माहिती नाहीं. ह्मणून या भागांत त्यांच्या संप्रदायाविषयीं थोडी माहिती देण्याचा विचार आहे.

हिंदुस्थानांतील बहुतेक दशनाम–उपपदें धारण करणारे गोसावी हे श्री शंकराचार्यांच्या अद्वैत मताचे अनुयायी आहेत. बंगाल्यांतील कांहीं गोसावी चैतन्याचे वैष्णव मताचे अनुयायी आहेत; अथवा तिकडील वैष्णव संप्रदायाचा पाया त्यांनींच घातला असें ह्मटलें तरी चालेल. वल्लभ संप्रदायाचे गोकुळिये गोसावी व गिरि, पुरी, भारती, आदि उपनांव धारण करणारे गोसावी यांचा आज संबंध नाहीं. परंतु प्राचीनकाळीं संबंध असावा असें स्वामी विवेकानंदांच्या व्याख्यानावरून दिसतें. त्यांनीं कोलंबो ते आलमोरा या व्याख्यान मालेंतील एका व्याख्यानांत असें सांगितलें कीं " श्री चैतन्य हे माध्वपुरींचे शिष्य व माध्वपुरी हे प्राचीन आचार्य परंपरे-पैकीं. आणि वल्लभ संप्रदाय हा चैतन्य संप्रदायापासून निघाला". ह्मणने आचार्यांच्या संप्रदायाची ही एक उपशाखा होय. मात्र ती आज वैष्णव संप्रदाय ह्मणून प्रसिद्ध आहे. अस्तु. दशनामी गोसावी हे आचार्यांचे कट्टे अनुयायी पण त्यांनीं प्राचीन नारायणीय धर्म सोडला नाहीं, हें ' गोसावी व नारायणीय धर्म ' व ' गोसावी व राजकारण'. या प्रकरणावरून ध्यानी आलेंच असेल. असो. आतां त्यांच्या संप्रदायाकडे वळूंः–

हिंदुस्थानांत प्राचीन काळीं यज्ञ यागाचें महत्व होतें. पुढें तें मागें पडून उत्तरवेदकालीन संन्यास जोमांत आला. पुढें त्याचा फायदा घेऊन बुद्धानें आपला बौद्ध धर्म स्थापन केला. या बौद्ध धर्माची भरभराट इ. स. २०० पर्यंत टिकून नंतर ब्राह्मणी धर्म व संस्कृत भाषा यांना चढती कळा लागली. तिसऱ्या शतकांत गुजराथ व सुराष्ट्र येथील क्षत्रीय राजांनीं त्यांचा पुरस्कार केला. आणि पांचवे शतकांत तर गुप्त सम्राटांनीं हिंदुधर्माचा अम्मल पूर्ववत सर्वत्र बसविला. गुप्त राजे बौद्ध व जैन धर्मीयांना पूर्ण सहिष्णुतेनें वागवीत पण ते स्वत: पक्के हिंदु होते. ते संस्कृत भाषेचे व पंडितांचे आश्रयदाते असून ब्राह्मणांच्या सल्ल्यानें चालणारे होते. बौद्धांचा यज्ञयागनिषेध खोटा ठरवून त्यांनीं अश्वमेधासारखे यज्ञ पुन्हां चालू केले. गुप्त काळांत यज्ञांचें पुनरुज्जीवम झालें. त्यास हर्षानें पुन्हां बंदी केली. त्याकाळीं बहुतेक ब्राह्मणांच्या घरांतून प्राचीम वैदिक कर्ममार्गाचा अवशेष ह्मणून अग्निहोत्र असे. त्याचप्रमाणें उत्तर वेदकालीन मार्गाचा भाग जो **संन्यासाश्रम** त्याचे देखील भक्त व अनुयायी हर्ष काळीं पहावयास सांपडत. या संन्यशांपैकीं कित्येक फार सत्वशील व विद्वान् असत. हर्षाचे काळीं सर्व हिंदुस्थानभर बौद्ध मठ पसरले असून त्यांत हजारों भिक्षु व भिक्षुणी यांस आश्रय मिळे. त्याकाळीं जैन, संन्यासी, श्वेतांबर जैन, श्वेतवस्त्री, भिक्षु, भागवत, ब्रह्मचारी, केशलुंचक, सांख्य, चार्वाक, वैशेषिक, वेदांती, नैय्याइक, धातुवादी, धर्मशास्त्री, पौराणिक, पूर्वमीमांसकयज्ञवादी ( सासतंतु ), शैव, वैय्याकरण, पांचरात्र ( वैष्णव ) इत्यादि मताचे लोक अस्तित्वांत होते. हर्ष इ. स. ६४७ मध्यें मरण पावला आणि पुढें मौखरी घराण्यांतील यशोवर्मा याचे कारकीर्दींत वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन झालें.

येणेंप्रमाणें सातवे शतकाचे अखेरीस व आठवे शतकाचे प्रारंभीं हिंदुस्थानांत अनेक राज्यांच्या उलथापालथी व धर्मक्रांत्या होत होत्या. जैन व बौद्ध धर्मांच्या ' मेणाहुनी मऊपणा " चा लोकांना कंटाळा वाटूं लागला होता. कुमारिल भट्टासारखे ममींसक वैदिक धर्माचा पुनरुज्जीवनाचा मार्ग निष्कंटक करित चालले होते. एखाद्या मोठी क्रांति घडवून आणणारे महापुरुषाचे

अवताराची लोक मार्ग प्रतिक्षा करूं लागले होते. जिकडे तिकडे विलक्षण जागृति उत्पन्न झाली होती. अशा वेळीं श्री शंकराचार्यांचा जन्म झाला. आणि दशनाम गोसाव्यांचा संप्रदाय अर्थात् अद्वैत संप्रदायाचा उदय झाला.

हिंदुस्थानांत बुद्धाचे वेळीं लोकांना वैदिक यज्ञयागाचा कंटाळा आला होता म्हणून त्याला आपला बौद्ध धर्माचा प्रसार करणें सोपें गेलें. त्यानंतर तर्कशास्त्र व बौद्धिक विचाराचा फैलाव झाला. हा प्रकार हजार बाराशें वर्षें चालल्यावर तर्कावर रचलेल्या धर्मज्ञानाचा लोकांस कंटाळा आला. पुन्हां शब्द प्रमाणाकडे प्रवृत्ति झाली. पूर्वमीमांसेनें शब्द प्रमाणाचे नियम घालून दिले व श्री शंकराचार्यांनीं त्या नियमांस अनुसरून वेदान्तशास्त्र तयार केलें. त्या मुळें सनातन वैदिक धर्माची स्थापना होऊन लोकांची चंचलवृति स्थिर होऊन ब्रह्मज्ञानाकडे लक्ष लागलें. आचार्यांचा अद्वैतवाद व मायावाद यांनीं राष्ट्रांत विलक्षण क्रांति घडवून आणली.

आचार्यांनीं हें महत्त्वाचें कार्य अगदीं बालवयापासून हातीं घेतलें. वैदिक धर्माच्या संस्थापनेकरितां त्यांनीं सर्व हिंदुस्थानभर प्रवास केला. मुख्य चार दिशांस चार मठ स्थापन केले. पूर्वीचा विस्खळित गोस्वामी समाज नियमबद्ध केला. आपल्या शिष्यांपैकीं अधिकारी विद्वानांची या पीठांवर स्थापना केली. आणि सर्वत्र अद्वैत मताचा प्रसार केला. हें कार्य करण्यास आचार्यांना त्यांचे गिरी, पुरी, भारती नामा शिष्यांचें फार सहाय्य झालें. या शिष्यांपासूनच दशनाम संन्यास प्रसूत झाला. इतरांप्रमाणें गृहस्थ गोसावीहि आचार्यांचे शिष्य झाले. अर्थात् त्यांनीं आचार्यांचा अद्वैत संप्रदाय उचलला. The principal followers of Sankara were Mandan, Padmapada, Hastamalaka and Totaka, of these, Padmapada had two disciples, Tirtha and Asrama; Hastamalaka two, Vana and Aranya; Totaka three, Giri, Parvata and Sagara; and Mandana three, Sarasvati, Bharati and Puri. These names are of course titles conferred on the disciples on their entering the order. The ten well-known sections of the order of Sanyasis, established by Sankara, derive their names from these leaders of the school. Of the many mathas or colleges of the school,

four seem to have been established by the illustrious founder himself. They are the Sringagiri Matha on the Sringeri hills, the Sarada Matha at Dwarka, the Govardhana Matha at Puri, and the Jyosi Matha on the Himalayas (Badarikasrama).

All this vast and fruitful work, which has had, and continues to have, after the lapse of one thousand years, the deepest influence on the religious life of the country, was done by one who, at the close of his wonderful career, had not yet passed his youth, for Sankara died in A. D. 830 (720), at the early age of 32, at Kedar on the Himalayas. (S. P. 8)

या संप्रदायाचे प्रवर्तक जे आचार्य त्यांच्या गुरुपरंपरेचा आतां थोडा विचार करूं.

## गुरुपरंपरा

शिवं ज्ञानोपदेष्टारं विष्णुं धर्मोपदेशकम् । विधिं वेदप्रवक्तारं गुरुमूर्तित्रयं भजे ॥
वसिष्ठं ब्रह्मविच्छ्रेष्ठं शक्तिं योगविदां वरम् । पराशरं पुराणज्ञं प्रणतोऽस्मि मुनित्रयम् ॥
व्यासं वेदान्तसूत्राणां वक्तारं बादरायणम् । श्रीशुकं सूत्रकारं च भजे वेदान्तदेशिकौ ॥
श्रीमद्गौडपदाचार्यमद्वैतार्थप्रबोधकम् । गोविंदभगवत्पादमद्वैताचार्यमाश्रये ॥
अद्वैतस्थापनाचार्यं शंकरं लोकसद्गुरुम् प्रस्थानत्रयभाष्यादि ग्रन्थकारं नमाम्यहम् ॥

गोवर्धनमठ—गुरुपरंपरा.

याचा अनुक्रम असा:—

| | | | |
|---|---|---|---|
| शिव | वसिष्ठ | व्यास | गोविंदयति |
| विष्णु | शक्ति | शुक | शंकराचार्य |
| ब्रह्मा | पराशर | गौडपाद | |
| वसिष्ठ | व्यास | गोविंदयति | |

**संन्यास पद्धति** या पोथींत आचार्यांची गुरुपरंपरा अशी दिली आहे:—

असंख्य-सांख्य-अर्बुद (?)
|
शून्य
|
महाशून्य
|
ॐकार
|
नमोनम:
|
नारायण
|
योग
|
युग
|
अविगत
|
शिव
|
विष्णु
|
ब्रह्मा
|
मार्कंडेय
|
लोम
|
धौम–धर्म
|
विमल
|
अत्रि

|
अत्रि
|
दत्तात्रय
|
पराशर
|
सारासर (?)
|
भारद्वाज
|
गौतम
|
गर्ग
|
जनक
|
शुक
|
श्वेत
|
केत
|
दुर्वास
|
रोहिष्य
|
जडभरत
|
वामदेव
|
कामदेव

|
कामदेव
|
कपदेव
|
कपिल
|
पंचशिख
|
ऋषिमुनि
|
देवमुनि
|
शिवमुनि
|
सेवाचार्य
|
षण्मुखाचार्य
|
विश्रवाचार्य
|
द्रोणाचार्य
|
वेदवाचार्य
|
गौडाचार्य
|
भट्टाचार्य
|
वालगोविंदाचार्य
|
श्री शंकराचार्य

## स्वात्मबोध नामक पोथींतील परंपरा:—

सुप्रसिद्ध सत्पुरुष श्री नृसिंह सरस्वती यांचा शिष्य कृष्ण चैतन्य, त्याचा व्यंकटेश चैतन्य, त्याचा स्वानंद चैतन्य, त्याचा कृष्णानंद. हा कृष्णानंद वऱ्हाडांतील कारंज्याचा राहणारा. यानें "स्वात्मबोध" नामक वेदांतपर ग्रंथ लिहिला आहे. तो अजून अप्रकाशित आहे. त्याची एक हस्तलिखित प्रत माझे स्नेही श्री. य. खु. देशपांडे पापळकर यांनीं येथील विद्वान ॲडिशनल डिस्ट्रिक्ट जज्ज श्री. परांडेसाहेब यांचे जवळून वाचावयास आणली होती. ती त्यांनीं कृपाकरून मलाहि वाचावयास दिली होती. या पोथींत ही परंपरा खालीं दिल्याप्रमाणें आढळली:—

ब्रह्मा -

| | | | |
|---|---|---|---|
| मार्कंडेय | गौतम | दुर्वास | शिवाचार्य |
| रोमऋषि | गर्ग | रोहिप्य | सन्मुखाचार्य |
| धर्मऋषि | जनक | जडभरत | गौडाचार्य |
| दत्तात्रय | शुक | कपिल | शंकराचार्य |
| पराशर | श्वेत | ऋषिमुनि | |
| भरद्वाज | कैत | देवमुनि | |
| गौतम | दुर्वास | शिवाचार्य | |

## तांत्रिक पद्धतीप्रमाणें गुरुपरंपरा

१ आदिनाथ २ आदिशक्ति ३ सदाशिव ४ सदाशिवशक्ति ५ ईश्वर ६ ईश्वरशक्ति ७ रुद्र ८ रुद्रशक्ति ९ विष्णु १० विष्णुशक्ति ११ ब्रह्मा १२ ब्रह्मशक्ति १३ सनक १४ सनंदन १५ सनातनानंद १६ सनत्कुमार १७ सनत्सुजात १८ ऋभुक्षानंद १९ दत्तात्रेय २० रैवतक २१ वामदेव २२ व्यास २३ शुक २४ नृसिंह २५ महेश २६ भास्कर २७ महेंद्र २८ माधवानंद २९ विष्णुदेव ३० गौडपाद ३१ गोविंद ३२ श्री शंकराचार्य. (भा.इ.सं.मं.पं.स.पा.६६)

श्री शंकराचार्यांच्या पूर्वीच्या आचार्यांच्या निरनिराळ्या मालिका वर दिल्या आहेत. हीं नांवें कित्येकांच्या मताप्रमाणें प्रत्यक्ष गुरूंचीं आहेत आणि कांहींच्या मतानें लाक्षणिक समजलीं पाहिजेत. कांहीं जरी असलें तरी या मालिकांतून प्रमुख आचार्यांचीं नांवें सारखींच आढळतात. हीं नांवें वेदांत मत प्रतिष्ठापकांचींच आहेत ही गोष्ट मात्र उघड दिसते. शिवानें ज्ञान, विष्णूनें भक्तिरूप धर्म, आणि ब्रह्मदेवानें चतुर्वेद विद्या देऊन ' ज्ञान–भक्ति–कर्म ' या त्रिपाद अद्वैत मताचा जो पाया प्राचीन कालीं घातला होता, त्या वर आचार्यांनीं भव्य इमारत उभारून दिली, ही गोष्ट अगदी स्पष्ट आहे.

आतां शिष्य परंपरेकडे वळूं:–

## शिष्य परंपरा

आचार्यांचे मुख्य शिष्य चार प्रसिद्ध आहेत, ते सुरेश्वराचार्य, पद्मपादाचार्य, हस्तामलकाचार्य, व तोटकाचार्य. त्यांशिवाय चित्सुख, सर्वज्ञ, श्रीचरण, विश्वरूप वगैरे दुसरे शेंकडों शिष्य आचार्यांभोंवतीं असावेत. हस्तामलक आणि तोटक यांचे विषयीं अद्भुत कथा आहेत. दोघेही बालपणीं अगदीं मूढ होते. पण गुरूचें दर्शन झाल्याबरोबर त्यांना एकदम ज्ञान झालें. हस्तामलकाचें पहिलें नांव पृथ्वीधर किंवा पृथ्वीधव. तो प्रख्यात मीमांसक प्रभाकर याचा मुलगा. प्रभाकर प्रयागाजवळ श्रीवल्ली ऊर्फ प्रतिष्ठानपुरी म्हणजे हल्लीं गंगेच्या उत्तरतीरावरील झुशी गांवी रहात असे. आचार्यांचा व प्रभाकराचा वाद झाल्यावर त्यांनीं लहानपणापासून वेडसर दिसणारा आपला पृथ्वीधर मुलगा आचार्यांस अर्पण केला. आचार्यांनीं त्याला " कस्त्वं शिशो कस्य कुतोऽसि गन्ता । किं नाम ते त्वं कुत आगतोऽसि " असा प्रश्न केल्याबरोबर त्याला हातावरील आंवळ्याप्रमाणें सर्व ज्ञान एकदम आलें, व त्यानें हस्तामलक नामक ग्रंथ रचला; व म्हणून त्याला हस्तामलकाचार्य नांव पडलें. त्याचप्रमाणें तोटकाचार्यालाही तोटक वृत्तांत गुरुस्तुति केल्यामुळें तोटकाचार्य हें नांव मिळालें. पद्मपादाचार्यांचें मूळ नांव सनंदन. त्याचा बाप माधव आई लक्ष्मी व जन्मस्थान अहोबल गांव. आईबाप लहानपणीं वारल्यामुळें सनंदनाचें शिक्षण मामा दिवाकरध्वरीनें केलें व आपल्या मुलीशीं लग्नही करून दिलें. दिवाकरध्वरी प्रख्यात मीमांसक प्रभाकर याचा पट्टशिष्य होता, व सनंदनही त्याच्या अध्यापनानें विद्वान्

पंडित झाला. पण चित्ताचें असमाधान, मामाशीं मतभेद आणि पूर्ण वैराग्य यांचा अंमल बसून नवा गुरु शोधण्याकरितां तो बदरिकाश्रमीं गेला. त्या वेळीं शंकराचार्य मातोश्रीला भेटण्याकरितां केरल देशांत गेले होते, तिकडे गोविंदमुनींनीं सनंदनास निरोप सांगण्यास पाठविलें कीं, आपण समाधिस्थ होण्याकरितां ओंकार क्षेत्रास जातों, तेथें लवकर येऊन भेटावें सनंदन आचार्यांस भेटला, व शिष्य होऊन ओंकारास गोविंदयतीकडे घेऊन आला. तेव्हांपासून सनंदन आचार्यांचा पट्टशिष्य झाला. एकदां काशी क्षेत्रांत इतर शिष्यांना सनंदनाचा मत्सर उत्पन्न झाला. तेव्हां आचार्यांनीं गंगेच्या पैल तीरावरून एकदम हांक मारली व तोहीं योगबलानें पाण्याच्या पृष्ठभागावरून चालत आला. त्या वेळीं त्याच्या प्रत्येक पायाखालीं पाण्यांत कमलपत्रें उगवलेलीं दिसलीं; त्यामुळें त्याला पद्मपाद असें नांव मिळालें. आचार्यांच्या सर्व शिष्यांत यौगिक सामर्थ्य पद्मपादाचें अधिक होतें. अमरु राजाच्या शरीरांत प्रवेश केल्यानंतर आचार्यांना पूर्व देहाचा कांहीं वेळ विसर पडला, तेव्हां पद्मपादानेंच त्यांना स्वरूपाचें स्मरण करून दिलें. तसेंच कापालिकानें मंत्रशक्तीनें आचार्यांचे शरीरांत दुर्धर रोग उत्पन्न केला तेव्हां पद्मपादानें योगबलानेंच त्याचा प्रतिकार केला. अलीकडे समर्थ रामदासांचा कल्याण शिष्य झाला, तसाच शंकराचार्यांचा पद्मपाद निःसीम शिष्य होता, व त्यामुळें त्याला आचार्य शिष्यांत अग्रस्थान मिळालें.

विद्वत्तेनें आणि प्रसिद्धीनें सर्वांत श्रेष्ठ शिष्य सुरेश्वराचार्य. पूर्वाश्रमींचें नांव मंडणमिश्र. मंडणाची स्त्री सरस्वती ऊर्फ सरसवाणी कुमारिलभट्टाची बहीण होती ! त्यामुळें मंडण त्याचा मेव्हणा व कट्टा अनुयायी होता. मिश्रपदावरून तो काश्मीरी किंवा पूर्वात्य आसामी ब्राह्मण असावा. रहाण्याचें ठिकाण नर्मदेच्या कांठीं माहिष्मती नगर, ह्मणजे हल्लींचें महेश्वर. आचार्यांनीं वादांत पराजय केल्यावर मंडणानें संन्यास घेऊन सुरेश्वराचार्य नांव घेतलें. सुरेश्वर नांवानें भाष्यकाराचे पट्टशिष्य ह्मणून प्रसिद्धि पावून कांहीं काल नर्मदेच्या कांठीं मगध देशांतच मंडणमिश्रानें वास केला, असें माधवकृत शंकरदिग्विजयांत ह्मटलें आहे. पुढें पद्मपाद आणि सुरेश्वर यांच्यामध्यें ईर्ष्या उत्पन्न झाली असावी.

विशेषेकरून सुरेश्वराचे विद्वत्तेपुढें पद्मपादाचें तेज कमी होऊं लागल्यानें वैषम्य उत्पन्न झालें असावें. एकदां आचार्यांनीं सुरेश्वराला आपल्या शारीरभाष्यावर वार्तिकें रचण्यास सांगितलें. तेव्हां पद्मपाद ह्मणाला, मलाही वार्तिकें करतां येतात. आचार्यांनीं बरें ह्मणून त्याला सांगितलें व त्यावरून पद्मपादानें पंचपादिका ह्मणून चतुःसूत्रीवर वार्तिक ग्रंथ केला. सुरेश्वरांनीं नैष्कर्म्यसिद्धि, ब्रह्मसिद्धि, उपनिषद्भाष्यवार्तिकें, व दुसरे पुष्कळ ग्रंथ लिहिले. सुरेश्वराचार्याला विश्वरूपाचार्य असेंही ह्मटलेलें आढळतें. पराशरस्मृतिटीकेंत सुरेश्वराच्या 'संबंधवार्तिका' तील एक उतारा विश्वरूपाचे नांवानें दिला आहे. व तसेंच 'विवरणप्रमेयसंग्रहां'त बृहदारण्यक वार्तिकांतला उतारा आहे. शृंगेरी गुरुपरंपरेंत आद्य आचार्यांनंतर सुरेश्वराचे ऐवजीं विश्वरूप नांव आढळतें, व त्यालाही वार्तिकाचार्य ह्मटलें आहे. यासंबंधानें मतभेद आहे. सुरेश्वराची शृंगेरी गादीवर नेमणूक झाली असें कांहीं ह्मणतात, व कांहीं त्यास द्वारकामठाकडे ओढतात. तो ब्रह्मचारी नसल्यामुळें त्याला कोठेंच पीठाधिकारी न करितां सर्वांवर निरीक्षक नेमलें असाही एक पक्ष आहे. ( शं. सं. पा. ४८ ) सुरेश्वराचार्य ह्मणजे मंडणमिश्र. यांचे पूर्वाश्रमीचें नांव विश्वरूप होतें असें शंकर दिग्विजय ग्रंथावरून दिसतें. तेव्हां विश्वरूप व सुरेश्वर हे एकच होत. हे दोन पुरुष वेगळे होते, असें मानल्यामुळें घोंटाळा होत होता, ह्मणून हा खुलासा करणें अवश्यक वाटलें.

आचार्यांचे निकटवर्ति शिष्यांपैकीं तोटकगिरी, पद्मपादतीर्थ, हस्तामलक भारती व स्वरूपाचार्य हे पीठाधिकारी झाले, अशी माहिती मिळते. हस्तामलक भारती यांचें पूर्वीचें नांव पृथ्वीधर. हे विश्वरूप–मंडणमिश्र–ह्मणजे सुरेश्वराचार्य यांचे मागाहून पीठावर बसले असावे. कारण शंकर दिग्विजयांत आचार्यांनीं भारती संप्रदायाचा प्रसार करण्याकरितां मंडणमिश्रास–सुरेश्वर असें सांप्रदायिक नांव देऊन शृंगेरी पीठावर स्थापिलें, अशी माहिती स्पष्ट रीतीनें लिहिलेली आढळते. जुने ग्रंथ उपलब्ध झाल्याशिवाय हा वाद मिटणें शक्य नाहीं. तूर्त वरील चार शिष्य चार पीठांवर आरूढ झाले व तेथून दशनाम गोस्वामी समाजाचा संप्रदाय विस्तृत झाला, ही गोष्ट ऐतिहासिक सत्य आहे, असें ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं. ही संप्रदाय परंपरा पुढें दिली आहे:–

श्री आचार्य, त्याचे प्रमुख चार शिष्य व दशनाम गोसावी यांचा संबंध काय, हें खाली दिलेल्या तक्त्यावरून ध्यानीं येईल:—

## आचार्यांची शिष्य परंपरा (गोसाव्यांची संप्रदाय परंपरा)

### श्री शंकराचार्य

- **१** (१) तोटकगिरी ऊर्फ त्रोटकाचार्य (ज्योतिर्मठ) ब्रदरीकेदार [ गिरी, पर्वत, सागर ]
  - नारायणगिरी → बयानंदगिरी → कृष्णानंदगिरी → हरहरानंदगिरी → देवानंदगिरी → सचिदानंदगिरी → अच्युतानंदगिरी
  - पूर्ण पर्वत → गोपनाथपर्वत
  - रामसागर
- **२** स्वरूपाचार्य (शारदामठ–द्वारका) [ तीर्थ आश्रम ]
  - कच्छतीर्थ
  - कूर्माश्रम
- **३** पृथ्वोद्धाराचार्य ( शृंगेरी मठ ) [ पुरी, भारती, सरस्वति ]
  - नियानंदपुरी
    - किसनचैतन्यपुरी → हरहरविष्णुपुरी → केशवपुरी मुलतानी → (५)
    - गोपाळपुरी → बन्सगोपाळपुरी → जयमदन गोपाळपुरी → वैकुंठपुरी → (६)
    - नार्णानंदपुरी → पूर्णानंदपुरी → किसनचैतन्य पुरी → गौडेश्वरपुरी → गोदडपुरी → (७) गंगदर्यावपुरी
  - हस्तामलकभारती → सस्तामलभारती → जोहारसिंहासन → हरद्दढ भारती → लाटपाटभारती → कनककस्तुरीभारती → (८) नृसिंह भारती
  - जीवानंदसरस्वती
- **४** पद्माचार्य ( गोवर्धनमठ ) जगन्नाथपुरी [ बन अरण्य ]
  - वसिष्ठबन → सुरतबन → सुरतबन → (९) आत्मबन → गंगाबन सिंहासनी → गोपालबन → बालसुंदरबन
  - शंभुअरण्य → (१०) बाल्हारी → भंडारी → कोठारी → शंकारी

अच्युतानंदगिरी

जमतानंदगिरी

सदानंदगिरी

ॐकारगिरी (मठ बेरलमवासा बिकानेर) — रामदत्तगिरी (मठ छछका-मिनी) — वेदगिरी (मठ तिबेट चीन) — (२) ब्रह्मगिरी ऊर्फ अवघडनाथ (मठ थळी मारवाड)

मेघनाथगिरी (३) — अपारनाथगिरी (४)

**टीप:**–ही माहिती लछमनभाट हैद्राबाद, दुर्गारामभाट राजपुताना ज्वालाराय करोली, रामचंद्राव उच्चेगांव, विहारीलाल हैद्राबाद वगैरे प्रसिद्ध भाटांच्या पोथ्यावरून गोळा केली आहे. पर्वत, सागर, तीर्थ, आश्रम यांच्या परंपरेचा कागद गहाळ झाला. हा माहिती मिळविण्याचा प्रयत्न सुरू आहे. माहिती आल्यावर परिशिष्टांत दिली जाईल. या शिवाय प्रत्येक पीठाची खास परंपरा वेगळी आहे.

(१) आचार्याचे प्रमुख चार शिष्यांपैकीं एक गिरीनामाचे आम्नाय. यांनी तोटक वृत्तांत तावडतोब पद्यरचनाकरून पद्मपादांचा गर्व परिहार केला. यांचेपासून ज्योतिर्मठाची परंपरा सुरू झाली.

(२) हे सुप्रसिद्ध सिद्ध पुरुष. यांनी हिंगलाज येथें गोरखनाथाचा पराभव केला. तेव्हां गोरखनाथांनी त्यांना ' अवघडनाथ ' म्हणून संबोधिलें. हिंगलाज येथें आजतागायत ब्रह्मगिरींच्या धुनीला अगोदर प्रदक्षिणा करितात नंतर गोरखनाथाच्या धुनीला करतात. यांच्याच परंपरेपैकीं रिद्धनाथ यांचे ३६० शिष्य होते.

(३) यांनी गिरींच्या १३ मठी स्थापन केल्या.

(४) यांनी गिरींच्या १४ मठी स्थापन केल्या.

(५) यांनी मुलतानी पुरींच्या ४ मठी स्थापन केल्या.

(६) वैकुंठी पुरींच्या ४ मठी स्थापन केल्या.

(७) यांनी पुरींच्या ४ मठी स्थापिल्या.

(८) यांनी भारतींच्या ४ मठींची स्थापना केली.

(९) यांनी बननामांच्या ४ मठी स्थापिल्या.

(१०) यांनी अरण्यांच्या ४ मठी स्थापिल्या.

या माहितीवरून दशनाम गोसावी हे आचार्यांचे संप्रदायिक शिष्य आहेत हें स्पष्टपणें ध्यानांत येईल. श्री. आचार्यांनीं आपले संप्रदायाचे प्रसारार्थ चार मठांची योजना करून प्रत्येक मठाचे अनुयायी, देव, देवता, वेद, ब्रह्मचारी, महावाक्य, अधिकारक्षेत्र वगैरे नियम घालून दिले, ती माहीती खालीं दिली आहे. हे नियम संन्याश्यांकरितां आहेत कीं गृहस्थ गोसाव्यांकरितां आहेत हा वाद न करितां एकंदर व्यवस्थेवरून ते गृहस्थ गोसाव्यांकरितां आहेत, असें मी घेऊन चालतों. कारण त्या कालीं खऱ्या संन्याश्यांस त्रिरात्रीपेक्षां एका ठिकाणीं अधिक राहण्याला परवानगी नव्हती. मग देव, देवता व वेद यांचीं बंधनें समागमें घेऊन ते संचार करित, असें मानणें अयुक्तिक दिसतें. संन्याशी या धार्मिक खटाटोपापासून अलिप्त रहात—नव्हे संप्रदाय परंपरेप्रमाणें त्यांना अलिप्त रहाणें भाग होतें, असें अनेक पुराव्यांवरून सिद्ध होण्यासारखें आहे. हे नियम गोसाव्यांकरितां (विवाहित व अविवाहित विशेषेंकरून विवाहित घरबारी गोसाव्यांकरितां) आहेत, असें ह्मणणें चुकीचें होणार नाहीं. असो आतां ती माहितीच पुढें मांडू ह्मणजे खात्री पटेल.

## शारदामठ, द्वारका

पश्चिमदिशा, **शारदामठ**, कीटवार संप्रदाय, द्वारकाक्षेत्र, सिद्धेश्वर देवता, देवीभद्र काली, विश्वरूपाचार्य, गोमती तीर्थ, सामवेद, सिंधु, सौवीर, सौराष्ट्र, महाराष्ट्र या देशांवर अधिकार, महावाक्य **'तत्वमसि'** स्वरूप ब्रह्मचारी, पीठ कालिका, **तीर्थ व आश्रम** ही उपपदें धारणकरणारे गोसावी अनुयायी.

## गोवर्धनमठ, जगन्नाथ

पूर्वदिशा, **गोवर्धनमठ** भोगवार संप्रदाय, पुरुषोत्तम क्षेत्र, देव जगन्नाथ, देवी विमला, महासागर तीर्थ, पद्माचार्य, ऋग्वेद, महावाक्य **'प्रज्ञानंब्रह्म'**, प्रकाश ब्रह्मचारी, अंग, वंग, कलिंग, मगध, उत्कल, बर्बर या देशांवर अधिकार **वन, अरण्य** हीं उपपदें धारण करणारे गोसावी अनुयायी, पीठ कालिका.

## ज्योतिर्मठ, बदरीकेदार

उत्तरादिशा, **ज्योतिर्मठ** आनंदवार संप्रदाय, बदरिकाश्रम क्षेत्र, नारायण

देवता, पुन्यागिरि देवी, तोटकाचार्य, अखनंदा तीर्थ, आनंद ब्रह्मचारी, महा-वाक्य 'अयमात्मा ब्रह्म', कुरु, काश्मीर, कांबोज, पांचाल, वगैरे देशांवर अधिकार, वेद अथर्वण, पीठ पुर्णगिरि, गिरि, पर्वत, सागर, हीं उपपदें धारण करणारे गोसावी अनुयायी.

## शृंगेरी

दक्षिणादिशा, शृंगेरीमठ, भूरिवार संप्रदाय, रामेश्वरक्षेत्र, आदिवराह देवता, कामाक्षी देवी, आचार्य पृथ्वीधर, तुंगभद्रा तीर्थ, यजुर्वेद, चैतन्य ब्रह्मचारी, महावाक्य 'अहंब्रह्मास्मि', आंध्र, द्रविड, कर्नाटक, केरळ या देशांवर अधिकार पुरि, भारती, सरस्वति, हीं उपपदें धारण करणारे गोसावी अनुयायी. पीठ शारदा. या पीठावर ज्ञानगिरि, सिद्धगिरी आदि गिरिनामाहि आरूढ झाले आहेत.

शृंगेरी मठाम्नायस्तोत्रावरून या मठाचे अनुयायी पुरी, भारती, सरस्वती, अरण्य, तीर्थ, गिरि, आश्रम, हे आहेत असें दिसतें

या चार मठांत प्रचलित असलेल्या महावाक्यांचा उपदेश आचार्यांचे गुरु जे गोविंदनाथ यति यांनीं खुद्द आचार्यांस केला असें वर्णन आहे. ( शं. दि. पा. १८२ )

हे चार मठ दशनाम गोसाव्यांकरितां निर्माण केले. आणि खालील तीन मठ गाणपत्य, शाक्त, व योगमार्गी यांच्याकरितां स्थापन केले. या मठांत कांची मठाचा उल्लेख नाहीं. शिवाय तेथील अनुयायी इंद्रसरस्वती, हें नांव दशनामांत नाहीं.

## सुमेरुमठ

ऊर्ध्व दिशा, ईश्वर आचार्य, कैलास क्षेत्र, जीवसगुण संप्रदाय, ज्ञानपद अनुयायी, निरंजन देवता, माया देवी, मानस सरोवर तीर्थ, महावाक्य 'ॐ-सोहं हंसः' नारद ब्रह्मचारी, हा मठ जीवनमुक्त पुरुषांकरितां व गाणपत्यांकरितां.

## परमात्मामठ

आचार्य चैतन्य बाहू, संतोष संप्रदाय, योगी पदाभिमानी, नभोसरोवर क्षेत्र, परमहंस देवता, शांती देवी, त्रिकुटि तीर्थ, मुगुट ब्रह्मचारी, महावाक्य 'ॐ-हंस:'' हा मठ योग्यांकरितां.

## सहस्त्राक्ष कमलमठ

आचार्य सद्गुरु, चक्रेश संप्रदाय, तांत्रिक गुरुपदाभिमानी, तत्व अनुभवी क्षेत्र, आदि स्वरूप देवता, शास्त्रश्रवण तीर्थ, स्वरूप ब्रह्मचारी, चक्रपूजेंतील 'श्रीचक्र-संप्रवृत्तं' इ. महावाक्य. हा मठ शाक्तांकरितां.

## शृंगगिरिमठ, रामेश्वर

डॉ. व्हिन्सेंट स्मिथ यांचे बरोबर प्राचीन वस्तु संशोधन करणारे मि. मुकर्जी यांनीं सेंट्स आफ् इंडियांत लिहिलें आहे की; आचार्य दिग्विजय करित रामेश्वराला गेले. तेथें त्यानीं 'शृंगगिरी' नामक मठ स्थापिला. पीठावर पृथ्वीधराची योजना केली. वेद यजुर्वेद, गिरि, पुरि, भारती हे पदाभिमानी. या माहितीवरून रा. बोडस यांस 'शृंगेरीचें क्षेत्र रामेश्वर कसें', हें जें कोडें पडलें होतें, त्याचा उलगडा होतो. शिवाय मंडणमिश्र सुरेश्वराचार्य व पृथ्वीधर यांचाहि घोटाळा होत नाहीं. कारण शृंगेरीच्या पीठावर सुरेश्वराची योजना केली व रामेश्वराच्या पीठावर पृथ्वीधराची केली. ही माहिती नवीन आहे. ते लिहितात शृंगेरी येथें विद्यामठ स्थापन केला. त्याचे पदाभिमानी भारती. ( से. इं. पा. ९७ ).

वरील माहितीवरून शृंगेरी, गोवर्धन, ज्योतिः किंवा जोशी व शारदा हे मठ विशेषतः घरबारी गोसाव्यांकरितां निर्माण केलेले दिसतात. बाकीचे संन्यासी जिवन्मुक्त, योगी, सिद्ध, शाक्त व गाणपत्य यांच्याकरितां स्थापिले असें दिसतें, त्या कालीं जे निरनिराळे पंथ प्रचारांत होते, त्यांना आचार्यांनीं एकसूत्री करून त्यांच्या आवडीप्रमाणें त्यांचे देवांची वगैरे व्यवस्था केली. आचार्यांच्या लोकसंग्राहक बुद्धीचें हें विशेष वाखाणण्या जोगें उदाहरण आहे.

## पीठांची संक्षिप्त जंत्री.

| स्थान | आम्नाय | पीठ | मठ | आचार्य | क्षेत्र | तीर्थ | देव | शक्ति देवी | वेद | संप्रदाय | अनुयायी | ब्रह्मचारी | महावाक्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ शृंगगिरि | दक्षिणा-म्नाय | शारदा पीठ | शृंगगिरी मठ | पृथ्वीधर | रामेश्वर क्षेत्र | तुंग-भद्रा | आदि वराह | शारदा | यजुस् | भूरिवार | भारती, पुरि सरस्वती | चैतन्य ब्रह्मचारी | ‘अहं-ब्रह्मास्मि’ |
| २ बदरी नारायण | उत्तराम्नाय | पूर्णगिरि पीठ | ज्योर्तिमठ | तोटकाचार्य ऊर्फ तोटकगिरि | बदरि-काश्रम | अलक-नन्दा | नारा-यण | पूर्ण-गिरि | अथर्वण | आनन्दवार | गिरी, पर्वत सागर | आनन्द-ब्रह्मचारी | ‘अयमात्माब्रह्म’ |
| ३ द्वारका | पश्चिमा-म्नाय | कालिका पीठ | शारदामठ | पद्मपादा-चार्य ऊर्फ पद्मपाद तीर्थ | द्वारा-वती | गोमती | सिद्धे-श्वर | भद्र-काली | साम | कीटवार | आश्रम, तीर्थ | सुरूप-ब्रह्मचारी | ‘तत्व-मसि’ |
| ४ जगन्नाथ | पूर्वाम्नाय | विमला पीठ | गोवर्धनमठ | हस्तामलक भारती | जग-न्नाथ | महो-दधी | पुरुषो-त्तम | विमला देवी | ऋक् | भोगवार | अरण्य, वन | प्रकाश-ब्रह्मचारी | ‘प्रज्ञानं-ब्रह्म’ |
| ५ कांची | मौलाम्नाय | कामकोटी पीठ | शारदामठ | श्रीशंकर भगवत्पाद (?) | कांची | कम्पा-सर | एकाम्र-नाथ | काम-कोटी | ,, | मिथ्यावार | इंद्रसरस्वती | सत्य ब्रह्मचारी | ॐतत्सत् |

या शिवाय महाराष्ट्र व गुजराथ,उत्तर हिंदुस्थान, सिंध वगैरे भागांत मागाहून बरेच मठ व उपमठ स्थापन झाले.

हे उपमठ ह्मणजेच मठी—मढी. मुख्य चार मठांच्या या उपशाखा होत. या मठी संप्रदाय परंपरा दाखविणाऱ्या आहेत. परंतु प्राचीन गोत्रप्रवरांचा विसर पडल्यानें या मठींचाच उपयोग गोत्रांसारखा करतात.

**गिरींच्या २७ मठी** आहेत. यांत १४ अपारनाथांच्या व १३ मेघनाथांच्या. अपार **नाथाच्या** १४ येणें प्रमाणें:–१ ॐकारी, २ परमानंदी, ३ बेदगीरलांबाची, ४ बोदले, ५ नागेंद्र नाथी, ६ सहज नाथी, ७ वैकुंठ नाथी, ८ ब्रह्मांड नाथी, ९ रुद्रनाथी, १० कुसुम नाथी, ११ सागर नाथी, १२ अघोर नाथी, १३ पारस नाथी, १४ रत्ननाथ जतींची.

**मेघनाथाच्या** १३. त्यांचीं नांवें:– १ रिद्धि नाथी, २ सांवली संजानाथी, ३ दुर्गा नाथी, ४ अचल नाथी, ५ गहला नाथी, ६ रामदत्ती, ७ ब्रह्मनाथी, ८ सरभंग नाथी, ९ मोठे ज्ञान नाथी, १० लहान ज्ञान नाथी, ११ पाटंबरी, १२ सागर पोतले, १३ अरण्य नाथी.

**गिरिनामांतील प्रमुख**:– तोटकागिरी, नारायणगिरी, गुरुज्ञानानंदगिरी, कृष्णानंदगिरी, हरिहरानंदगिरी, देवानंदगिरी, सच्चिदानंदगिरी, अच्युतानंदगिरी, जगतानंदगिरी, व सदानंदगिरी. सदानंदगिरीचे ४ मुख्य शिष्य–ॐकारागिरी, रामदत्तगिरी, वेदागिरी व ब्रह्मागिरी. या ब्रह्मागिरीचे मुख्य शिष्य दोन अपारनाथ व मेघनाथ.

**पुरींच्या १६ मठी** ४ वैकुंठीच्या, ४ मुलतानीच्या, ४ गंगदर्यावच्या, ४ दशनाम तिलकाच्या.

**वैकुंठीच्या** ४:– १ केवल पुरीजीची, २ उद्योदेव पुरीजीची, ३ मथुर पुरीजीची ४ माधवासरवर पुरीजीची.

**मुलतानीच्या** ४ चीं नांवें– १ माधवपुरी करमखानी, २ ऋषिकेशपुरी, ३ रामचंद्रपुरी, ४ त्र्यंबक त्रियापुरी.

**गंगदर्याव** ४— १ सवाई दर्याव, २ बिजे दर्याव, ३ श्यामसुंदरपुरी ४ जडभरतपुरी. कांहींच्या मतानें १ गंगदर्याव २ सवाईदर्याव ३ लहर-दर्याव व ४ सहजदर्याव अशीं तीं नांवें होत. गंगदर्याव यांचे मुख्य शिष्य १८ होते. त्यांत दर्याव १२ व पुरी ६. या पुरींपैकीं कमलनयनपुरी यानीं दशनाम तिलकाचा झेंडा उभारला. तेथून **दशनाम तिलक** ही मठी सुरू झाली.

**दशनाम तिलक** ४, त्यांचीं नांवें:— १ भगवानपुरी, २ भगवंतपुरी ३ सहजपुरी, ४ मेघनाथपुरी ऊर्फ प्रागपुरी.

**पुरी नामांतील प्रमुख:**— विद्यानंदपुरी, नारणानंदपुरी, पूर्णानंदपुरी, किसनचैतन्यपुरी, गौडेश्वरपुरी, गूदडपुरी, गंगदर्यावपुरी. यांनीं गंगदर्यावच्या ४ मठी स्थापन केल्या.

**विद्यानंद पुरींची २री शिष्यशाखा:**— श्री गोपाळपुरी, बन्सगोपाळपुरी, जयमदन गोपाळपुरी, वैकुंठपुरी. यांनीं वैकुंठीच्या ४ मठी स्थापिल्या.

**विद्यानंद पुरींची ३री शिष्यशाखा:**— किसनचैतन्यपुरी, हरिहर विष्णु-पुरी, केशवपुरी मुलतानी. यांनीं मुलतानींच्या ४ मठी स्थापन केल्या.

**भारतींच्या ४ मठी:**— १ नरसिंहभारती, २ मनमुकुंदभारती, ३ विश्व-नाथभारती, व ४ पद्मनाभभारती.

याशिवाय माहूर येथील गुरुदत्तात्रयाची १ अशा ९ मठी.

**भारती नामांपैकीं मुख्य:**— हस्तामलकभारती, सस्तामल (?) भारती, जोरसिंहासनभारती, हरदढभारती, लाटपाटभारती, कनककस्तुरीभारती, नरसिंह-भारती यांनीं ४ मठी स्थापन केल्या.

**बन—बन** यांच्या ४ मठी:— १ आत्मबन पोवारी, २ गंगाबन सिंहासनीं, ३ गोपाळबन उर्फ भगवंतबन, बाळसुंदरबन उर्फ पुंजाबन.

**बनांचे अध्वर्यु:**— वसिष्ठबन सुरतबन, मुरतबन, आत्मबन. यांनीं ४ मठी स्थापिल्या.

गिरींच्या २७ मठीं पैकींच ४ तीर्थ, आश्रम यांनीं घेतल्या. कारण यांनीं स्वतंत्र मठी स्थापन केल्या नाहींत.

पुरींच्या २४ मठीं पैकीं ४ वन, अरण्य यांना दिल्या.

आश्रम, तीर्थ, सरस्वति, सागर हे मूळ त्रिदंडी संन्यासी. पण पुढें मठींच्या आश्रयाला राहिले.

नाथ उपपद— 'नाथ' हें उपपद गिरिनामाचे मठीच्या पुढें लावतात, त्यावरून गोसावी संप्रदाय हा 'नाथ संप्रदाया'च्या मागाहून निघाला असें कित्येक समजतात पण तें चुकीचें आहे. 'नाथ' ह्मणजे श्रेष्ठ-स्वामी, यती हे आपल्या नांवापुढें हें उपपद लावीत, ही गोष्ट आचार्यांचे गुरु जे गोविंदयति त्यांच्या नांवावरून सिद्ध होते. त्यांना गोविंदनाथ यति असें ह्मटलें आहे. गिरि ह्मणजे ज्ञानी—श्रेष्ठ, या अर्थानें प्राचीन वाङ्मयांत उल्लेख आढळतो. याचेंच द्योतक 'नाथ' हें उपपद ते आपणास लावूं लागले. नाथ संप्रदाय १२ वे शतकांत स्थापन झाला व गिरी संप्रदाय वेदकालचा आहे. तेव्हां 'नाथ संप्रदाया' पासून गिरी किंवा गोसावी संप्रदाय निघाला असें ह्मणणें अनैतिहासिक आहे.

## पोट संप्रदाय

गोसाव्यांचे मुख्य मठ जसे चार तसे पोट संप्रदायहि ४ आहेत. ह्मणजे प्रत्येक मठाचा वेग वेगळा आहे. त्यांचीं नांवें:— १ कीटवार, २ भोगवार, ३ आनंदवार व ४ भूरिवार. या संप्रदायांच्या व्याख्या येणें प्रमाणें आढळतात:—

### संप्रदायनिर्वचन

कीटादयो विशेषेण वार्यन्ते जीवजन्तवः ।
भूतानुकम्पया नित्यं कीटवारः स उच्यते ॥ १ ॥
भोगो विषय इत्युक्तो वार्यते येन जीविनाम् ।
सम्प्रदायो यतिनांच भोगवारः स उच्यते ॥ २ ॥

आनन्देतिविलासश्च वार्यते येन जीविनाम् ।
सम्प्रदायो यतीनाश्चान्दवार : स उच्यते ।। ३ ।।
भूरिशब्देन सौवर्णं वार्यते येन जीविनाम् ।
सम्प्रदायो यतीनाश्च भूरिवार: स उच्यते ।। ४ ।।

भावार्थ:– कीटकांवर दया करावयास प्रवृत्तकरणारा संप्रदाय **कीटवार** होय. भोग ह्मणजे विषयाचे ठिकाणची आसक्ति नाहींशी करावयास लावणारा संप्रदाय **भोगवार** जाणावा.

विलासावर असलेली प्रीति नाहींशी करून खऱ्या आनंदाचा प्रसारकरणारा संप्रदाय तो **आनंदवार** समजावा. भूरि ह्मणजे सुवर्णाचे ठायीं असलेला लोभ नाहींसा करावयास लावणारे संप्रदायास **भूरिवार** ह्मणावें.

## अखाडे

गोसाव्यांचे आखाडे ह्मणजे धार्मिक व लष्करी शिक्षण देणाऱ्या संस्था होत. हे अखाडे निदान अलेक्झांडरच्या वेळेपासून असावेत, असें ऐतिहासिक माहितीवरून ह्मणतां येतें. अलेक्झांडरला गोसाव्यांनीं चांगलाच हात दाखविला ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. चंद्रगुप्ताचे वेळींहि गोसावी राजकारणांत पडत ही गोष्टहि इतिहासांत नमूद आहे. सारांश गोसाव्यांचे आंगीं लष्करी तेज बाणण्यास हे अखाडे कारण झाले, असें ह्मणावें लागतें. गोसाव्यांचे हे अखाडे शिख, बैरागी, उदासी वगैरे लोकांच्या फार अगोदरचे आहेत. पृथ्वीराज व जयचंद यांनीं गोसाव्यांचे अखाडे पुन्हां व्यवस्थित केले, अशी माहिती दशनाम धर्म या पुस्तकांत दिलेली आहे. यावरून माझे विधानाची सत्यता कळून येईल.

हे आखाडे मुख्यत: १ सनातनी (जुना), २ निर्वाणी, ३ निरंजनी, ४ अटल, ५ अभान, ६ आनंद व ७ अग्नि असे ७ आहेत. प्रत्येक आखाड्याचा देव वेगवेगळा आहे. सनातनीचा **दत्त**, निर्वाणीच्या **कपिल**, निरंजनीचा **कार्तिक स्वामी**, अटलचा **गणपति** इत्यादि. या देवांचा मठांतील

देवांशीं अर्थात् गोसाव्यांच्या कुलदेवतांशीं संबंध नाही. ते वेगळेच आहेत. याविषयींची माहिती पोट संप्रदायानंतर दिलेल्या तक्त्यांत पहावी. या आखाड्यांत गोसावी भरती करण्याचे नियम असत. या नियमान्वयें भरती होणाराचें वय १८ वर्षांच्यावर व ४९ च आंत असावें लागे. भरती होणाऱ्यानें ब्रह्मचारीच राहिलें पाहिजे असा नियम होता. एकदां भरती झाल्यावर त्यानें तेथें १२ वर्षे काढलींच पाहिजे असा निर्बंध होता. आखाड्यांत भरती करतांना कोणकोणते संस्कार करावे लागत. याची माहिती बरीच उपयुक्त असल्यानें थोडक्यात येथें दिली आहे:- बौद्ध धर्माच्या आघातानें वैदिक धर्म अगदी नामशेष झाला तेव्हां श्री शंकराचार्यांनीं सर्व हिंदुस्थानांत संचार करून बौद्धांचा पाडाव केला. मुख्य ४ दिशांस ४ मठ स्थापून वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन केलें. त्यांच्या प्रतिभासंपन्न वाणीनें प्रत्येक हिंदुधर्मियांच्या मनांत वैदिक धर्माविषयीं आदर उत्पन्न झाला. तो इतका कीं आपले घराण्यांतून एक तरी पुरुष धर्म रक्षणाचे कार्यांत सर्वस्व अर्पण करणारा निघावा, असें प्रत्येकास वाटूं लागलें. या उत्कृष्ट भावनेनें गोसावी पंथांत शिरण्याची अहमहमिका सुरू झाली. पूर्वीचा विस्कळित समाज व्यवस्थित करण्याची अवश्यकता वाटूं लागली. प्राचीन आखाड्यांचा जीर्णोद्धार झाला. आखाड्यांत भरती करतांना नवीन येणार इसमास आखाड्यांतील निशाणासमोर उभा करित. तेथें एक ब्राह्मण उपाध्याय हजर असे तो त्या इसमाकडून कुलदेवता इष्टदेवता व ग्रामदेवता यांची पूजा करवीत असे. नंतर देवऋण, पितृऋण वगैरे सर्व ऋणांतून त्याची सुटका करवून त्याला धर्मकार्यार्थ सर्वस्व अर्पण करण्याबद्दल शपथ घ्यावयाला लावी. त्यानें शपथ घेतल्यावर ब्राह्मण "तथास्तु" असें ह्मणे. नंतर त्याचे शिखा, सूत्राचा त्याग करवून विरजाहोम करीत. नंतर गुरुसमोर नेऊन तेथील देवाची पूजा करावयास लावीत. नंतर तेथील गोसाव्यांकडून त्याला विभूति, रुद्राक्ष व भगवीं वस्त्रें देत. नंतर सर्व प्रकारचीं हत्यारें त्यास देत. नंतर ज्या मठांत त्याला रहावयाचें असेल त्या मठाच्या देवता, वेद वगैरेची त्याला माहिती करून देत. नंतर त्या मठाचे संप्रदायाप्रमाणें दशनामापैकीं एक नाम त्याला देऊन त्याला पूर्ण गोसावी करीत. मग

त्याचे हातीं गंगाजळ देऊन त्याला अशी शपथ घ्यावयाला लावीत ' हे जगत पवित्र गंगे तूं साक्ष आहेस, तुझ्या समोर मी आखाड्यांत भरती होत आहें. आणि अशी प्रतिज्ञा करतों कीं माझे शरीरांत प्राण आहे तोपर्यंत माझे पंथाचे संरक्षणाकरितां मी कधीच कुचराई करणार नाहीं. नंतर श्री शंकराचार्यांच्या पादुकावर हात ठेवून तो अशी प्रतिज्ञा करित असे " हे सद्गुरो आपल्या चरणाच्या प्रतापानें गो, ब्राह्मण, वेद व माझे मठाचे देव, देवता वगैरेंचे संरक्षण मी अखेरपर्यंत प्रामाणिकपणें करीन. " हा शपथविधि झाल्यावर त्याला पुन्हा आखाड्याच्या निशाणाजवळ नेत. आणि तेथील देवासमोर पुन्हां शपथ घेतल्या नंतर त्याला यज्ञोपवीत देऊन अभिषेकाचें विसर्जन करीत " (द. ध. पा. ११-१२)

या माहितीवरून गोसावी हा खरोखर एक " कर्मवीर " ह्मणून तयार होत होता, कीं जगाला तुच्छ मानून उदरंभरण करणारा एक आळशी संन्यासी तयार होत होता, हें सहज कळून येईल. या " कर्मवीर व धर्मवीर " गोसावी समजानें पोथी बरोबर हातीं शस्त्र घेऊन बौद्धांचा पाडाव केला (द. ध. पा. १२). या गोसाव्यांपैकीं बलभद्राचार्य यांच्या एका पंथकानें सहेट महेठ (श्रावस्ती) नामक सुप्रसिद्ध ठिकाणच्या बौद्ध भिक्षूंचा पराभव करून त्यांना पळवून लाविलें. तेथें बुद्धाची एक सुंदर मूर्ति होती ती छिन्नभिन्न करून टाकिली. तेव्हां आचार्यांस श्री रामचंद्रजीचा असा दृष्टांत झाला कीं हें कृत्य बरोबर नाहीं. तेव्हां त्यांनीं असा उच्छेद करूं नये अशी ताकीद दिली व बुद्धांचे मंदिरांत भोजन करतांना स्पर्शास्पर्शाचा विधिनिषेध बाळगूं नये, तेथून बाहेर पडल्यावर आपले ज्ञातीस व ब्राह्मणांस भोजन घालावें ह्मणजे तो शुद्ध होईल, अशी आज्ञा केली (द. ध. पा. १२)." ही आज्ञा प्रत्यक्ष श्री शंकराचार्यांची असो कीं बलभद्राचार्यांची असो, तिच्यावरून असें दिसतें कीं मूर्तींचा उच्छेद करण्याची मनाई झाली. या आखाड्यांसंबंधानें ' हरिद्वारचा इतिहास ' या पुस्तकांत अशी माहिती दिली आहे:- " हरिद्वार येथें कुंभाच्या मेळ्याचेवेळीं लाखो लोक जमतात. या मेळ्यांत निरंजनी, निर्वाणी, उदासी, निर्मले, बैरागी व फकीर यांच्या

झुंडीच्याझुंडी असतात. निरंजनी, निर्वाणी वगैरे आखाड्याचे गोसावी हत्ती, घोडे, उंट यांच्यावर सोन्याचांदीचे दागिने घालून त्यांच्यावर स्वार होऊन निशाण फडकावीत व डंका वाजवीत मोठ्या राजासारखे अगदीं लष्करी थाटानें या कुंभाचेवेळीं येतात. यांच्या या आखाड्यांतील लोकांचें कूच हुबेहूब लष्करी लोकांसारखें असतें. हे लोक हत्यारबंद असतात. फार प्राचीन कालापासून यांच्या फौजा आहेत. हे लोक फार शूर व धाडसी असतात हे नेहमी जिवावर उदार होऊन लढतात. यांनी पूर्वी अनेक राजांस लष्करी मदत केली आहे. कित्येक मोठमोठे राजे यांचे शिष्य होतात. यांचें अनुकरण 'उदासी' लोकांनीं केलें आहे, आणि निर्मल्यांनीं तर संवत १९१२ मध्यें आपला आखाडा स्थापन केला. निरंजनी व निर्वानी इत्यादि आखाड्यांत कांहीं नग्न गोसावी असतात. त्यांना नागे म्हणतात. हरद्वारला उतरण्यासाठीं त्यांचे करितां फार वर्षापूर्वीपासून फौजेच्या कोठड्यासारख्या कोठड्या तयार केल्या असून सभोंवति पक्के सपील (कोट) आहे. याचे मधोमध एक उंच चतुबतरा तयार केला असतो. त्याच्यावर आखाड्याचें लष्करी निशाण उभारलेलें असतें. याच्या खालीं विभूतीचा गोळा ठेवला असतो. या गोळ्याची पूजा फार समारंभानें केली जाते. त्यावेळीं कनखल, ज्वालापूर, हरद्वार येथील मोठमोठे शेट सावकार, जमीनदार व यात्रेस आलेले महाजन व राजे महाराजे दर्शनास येतात. कित्येक वर्षी लाखों रुपयांची पूजा चढते. पूर्वीसारखी कर्तबगारी या लोकांत राहिली नसून हल्लीं चैनीकडे जास्त प्रवृत्ति दिसते. इ." (ह. इ. पा. ९९ते९७)

या माहितीवरून शिख व बैरागी यांच्या अखाड्यांचे अगोदर गोसाव्यांचे आखाडे होते, असें जें आरंभाला मीं म्हटलें आहे, त्याची सत्यता कळून येईल. इतकेंच नव्हे तर आचार्यांनीं स्थापन केलेला गोस्वामीपंथ हा मूलत: **ब्रह्मक्षत्र वृत्तीचा** आहे, हेंहि ध्यानीं येईल. आजच्या भाषेत बोलावयाचें म्हणजे खरे **'निष्काम कर्मयोगी'** तयार करणाऱ्या या संस्था स्थापून आचार्यांनीं फार मोठी कामगिरी केली, असें मला वाटतें. आचार्यांचा दिग्विजय केवळ बुद्धिसामर्थ्यावरच झाला नसून त्याला शरीर सामर्थ्याचीहि जोड होती, असें दिसतें. या विषयासंबंधानें अधिक माहिती मिळाल्यास गोस्वामी समाजास आचार्यांनीं आळशी बनविलें हा जो आरोप आहे, तो सहज नाहींसा होईल.

या ठिकाणीं एका महत्वाच्या मुद्यासंबंधानें प्रामुख्यानें उल्लेख करावासा वाटतो. तो मुद्दा हा कीं महाराष्ट्रांत श्री रामदास स्वामींचा भगवा झेंडा फडकण्याचे अगोदर निदान सातशें वर्षे तरी गोस्वामी समाजाचा भगवा झेंडा उत्तर हिंदुस्थानांत विशेष प्रभावानें, फडकत होता. त्यानें मुसलमानांचा "हैदोस-दूला" कित्येक शतकें उत्तरेकडेच थोपवून धरला, इतकेंच नव्हे तर राजपुता-न्यांत त्यांस 'तोबातोबा' करावयास लाविलें. राजकारण व धर्म यांचा एक-जीव करून तो "स्वर्गीय कुसुंबा" रजपुतांना आकंठ प्राशन करावयास लावून त्यांचे प्रत्येक धमणींतून तो रसरसून बाहेर पडावयास लावण्याचें श्रेय या गोस्वामी समाजासच आहे. या अलौकिक कर्तबगारीचा स्फूर्तिदायक इतिहास रजपुतांच्या सोज्ज्वळ इतिहासाशीं समरस झालेला आहे. तो प्रामुख्यानें पुढें मांडण्याचें कार्य आजपर्यंत कोणीच केलें नाहीं. त्यामुळें तो जवळ जवळ अज्ञात स्थितींतच पडून आहे. तेथून हुडकून काढून आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाचें योग्य वर्णन करण्याची सद्बुद्धि एखादे गोसावी तरुणास झाली तरी माझ्या श्रमाचें चीज झालें असें मी समजेन !